2 7 MAY 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आव्हान’द्वारे आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## प्रशिक्षण शिबिराचा एक जूनला प्रारंभ : ‘एनएसएस’च्या १२०० स्वयंसेवकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे ‘आव्हान’ या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरातून दिले जाणार आहेत. राज्यपालांच्या कार्यालयाच्या सूचनेनुसार यावर्षी दि. १ ते १० जूनदरम्यान विद्यापीठात हे शिबिर होणार आहे. यात राज्यातील विविध विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) सुमारे १२०० स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी सहभागी होणार आहेत.

नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्ती उद्‌भवल्यास तिला कशा पद्धतीने सामोरे जावे, व्यवस्थापन कसे करावे याबाबत ‘एनएसएस’स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने दरवर्षी आव्हान प्रशिक्षण शिबिर घेतले जाते. राज्यपालांच्या कार्यालयाच्या सूचनेनुसार दरवर्षी राज्यातील एक विद्यापीठ या शिबिराचे संयोजन करते. गेल्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दि. ५ ते १४ जूनदरम्यान ‘आव्हान’ झाले होते. यंदा या शिबिराचे संयोजन शिवाजी विद्यापीठ करीत आहे. शिबिरात पुणे येथील राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दलातर्फे एनएसएसच्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रात्यक्षिक, तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. दरम्यान, ‘आव्हान’ची तयारी वेगाने सुरू आहे. यासाठी विविध २७ समित्यांच्या माध्यमातून काम सुरू असल्याचे विद्यापीठाच्या ‘एनएसएस’चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले.



### ‘आव्हान’मधील विद्यापीठाची कामगिरी

‘आव्हान’ या शिबिराचे संयोजन शिवाजी विद्यापीठाने सन २००७ मध्ये केले होते. यानंतर राज्यात विविध विद्यापीठांत झालेल्या या शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठाने यश मिळविले आहे. नागपूर येथे सन २०१४ मध्ये झालेल्या ‘आव्हान’मध्ये जनजागरण फेरीमधील उत्कृष्ट विद्यापीठाचा फिरता चषक पटकविला होता. गेल्या वर्षी पुणे येथे झालेल्या शिबिरात विद्यापीठाने उत्कृष्ट संघनायक (डॉ. धनंजय लोहार) आणि उत्कृष्ट स्वयंसेवक (शिवाजी जाधव) या विभागात यश मिळविले होते.

27 MAY 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्ती व्यवस्थापनाचे देणार धडे

## आव्हान २०१७ उपक्रम : १२५० विद्यार्थ्यांचा सहभाग; 'रिझर्व्ह फोर्स' कार्यरत होणार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तींमध्ये व्यवस्थापन कसे करावे, याचे प्रशिक्षण सुमारे साडेबाराशे विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठात देण्यात येणार आहे. १ ते १० जून दरम्यान होत असलेल्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरातून आपत्ती निवारणासाठी एक 'रिझर्व्ह फोर्स' तयार करण्याचा उद्देश आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून राष्ट्रीय



सेवा योजनेतील प्रत्येकी ४० विद्यार्थी शिबिरात सहभागी होऊन आव्हानांना तोंड कसे द्यायचे, याचे धडे गिरवणार आहेत.

भूकंप, वादळ, महापूर अशा नैसर्गिक आपत्तींत लोकांना काय करावे, हे सूचत नाही. लोक जखमी झाले असतील, तर त्यांच्यावर कोणते प्राथमिक उपचार करावेत, अथवा जनावरांची देखभाल कशी करावी, महापुरावेळी कोणती खबरदारी घ्यावी, याचे पुरेसे प्रशिक्षण त्यांना असत नाही. घरातील तरुण मुले व मुलींची स्थिती याहून वेगळी नसते. महाविद्यालयीन तरुणाईला तरी आपत्ती व्यवस्थापनाचे धडे मिळावेत, यासाठी 'आव्हान' उपक्रमांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे एनडीआरएफच्या प्रशिक्षकांतर्फे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रशिक्षण शिबिरासाठी प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी ४० विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. त्यात ३० विद्यार्थी व १० विद्यार्थिनींचा समावेश असेल. शिबिरात जमिनीवरील व पाण्यातील आपत्तींना तोंड कसे द्यायचे, याचे धडे विद्यापीठासह राजाराम तलाव परिसरात दिले जाणार आहेत. यातील महत्त्वाचा भाग म्हणजे गावातील जत्रा-यात्रा, लग्नसमारंभ, मिरवणुका यामध्ये अचानक आपत्ती घडल्यास त्या वेळी नेमकेपणाने काय करावे, यासह विवाह समारंभात विषबाधा झाल्यानंतर कोणते उपाय ताबडतोब करावेत, याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात हे विद्यार्थी आपत्ती व्यवस्थापनाची 'रिझर्व्ह फोर्स' म्हणून कार्यरत राहणार आहेत.

### राज्यपाल प्रमुख पाहुणे

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या तयार करण्यात येत आहेत. शिबिरार्थींच्या निवासाची सोय विद्यापीठाच्या वसतिगृहात करण्यात येणार असून, शिबिराच्या उद्घाटनासाठी राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांना आमंत्रित करण्याची तयारी सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2017
लोकमत

# विद्यापीठाच्या नियमित अभ्यासक्रमांसाठी आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर अधिविभागातील नियमित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आज, शनिवारपासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी भूगोल आणि मास कम्युनिकेशन हे विषयवगळून एम. ए. सर्व विषय, एम. कॉम., एल. एल. एम. आणि सर्व पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्ज भरण्याची मुदत दि. ९ जूनपर्यंत आहे. अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 MAY 2017

सकाळ

# 'नासा-एआरसिटी'साठी पूजाची निवड



**पूजा पवार**

कोल्हापूर, ता. २६ : पुणे येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी (आयआयटीएम) येथे होत असलेल्या 'नासा-एआरसिटी'च्या प्रशिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील एम.टेक.ची (पर्यावरण विज्ञान आणि तंत्रज्ञान) विद्यार्थिनी पूजा विजयकुमार पवार हिची निवड झाली आहे. या प्रशिक्षणामुळे वायू, गुणवत्तेशी संबंधित निर्णय घेण्याच्या कार्यात तिला प्रवेश व नासा संसाधनांचा वापर करण्याची संधी मिळेल. अशी माहिती संचालक डॉ. जयदीप बागी यांनी दिली. तिला डॉ. बागी यांच्यासह उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. सचिन घुडे, श्रीकांत भोसले यांचे मार्गदर्शन मिळाले.